**शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पास (ता. जि.जळगांव) तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

## <u>महाराष्ट्र शासन</u>
**जलसंपदा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- सुप्रमा-२०२४/(प्र.क्र.१५/२४)/(मध्यम प्रकल्प)**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक:- १७ एप्रिल २०२६**

**<u>संदर्भ</u>:-** १) महामंडळाचे पत्र क्र. मु.अ.तापाविमं/काअ/प्रवि-१/नविनप्र.मा.३/१९९९ दि. ०६/०४/१९९९
२) शासन निर्णय क्रमांक सुप्रमा-२०१०/८६५/ (प्र. क्र.२९३/१०)/ म.प्र.मंत्रालय, मुंबई दि.३०/११/२०१६
३) शासन निर्णय क्रमांक सुप्रमा-२०१९/१९५/ (प्र. क्र.६७/१९)/ म.प्र.मंत्रालय, मुंबई दि.०९/०९/२०१९
४) जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. पीएलएन २०१८/प्र.क्र.२८८/निवसं-१ दि. ०१/०१/२०१९
५) कार्यकारी संचालक तापाविम जळगाव यांचे पत्र क्र. कासं/तापाविम/प्रशा-५/५६१८/सन २०२३ दि. २६/१२/२०२३

**<u>प्रस्तावना</u>:-**

शेळगांव बॅरेज हा मध्यम प्रकल्प तापी पाटबंधारे विकास महामंडळ अंतर्गत मौजे शेळगांव ता.जि. जळगांव या गावापासून १.५० कि.मी. अंतरावर तापी नदीवर बांधण्यात येत आहे. शासन निर्णय दि. ०१/०१/२०१९ अन्वये सदर प्रकल्पाचा समावेश केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेत करण्यात आला आहे. या प्रकल्पाद्वारे जळगांव जिल्ह्यातील यावल तालुक्यातील १९ गावातील एकूण ९१२८ हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

प्रकल्पास शासन निर्णय दि. ०९/०९/२०१९ अन्वये दरसूची २०१७-१८ वर अधारित रु. ९६८.९७ कोटी किंमतीस द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव, यांनी संदर्भ क्र. ०५ अन्वये तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे.

या प्रकल्पाच्यारु. १४०७.२० कोटी किंमतीचा तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व्यय अग्रक्रम समितीच्या दि. ०१/१०/२०२५ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार मा. मंत्रिमंडळासमोर दि. २४/०३/२०२६ रोजीच्या बैठकीत सादर केला असता त्यास मंत्रीमंडळाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**<u>शासन निर्णय</u>:-**

शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पास (ता. जि.जळगांव) सन २०२३-२४ दरसुचीवर आधारित रुपये १४०७.२०कोटी (रुपये एक हजार चारशे सात कोटी वीस लक्ष फक्त) किंमतीच्या तृतीय सुधारित प्रकल्प अहवालास प्रशा़सकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रुपये १३१८.०६ कोटी (रुपये एक हजार तीनशे अठरा कोटी सहा लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ तसेच आस्थापना व अनुषंगिक खर्चासाठी रुपये ८९.१४ कोटी (रुपये एकोण्णवद कोटी चौदा लक्ष फ़क्त) तरतूद आहे. उपशिर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा सोबत जोडण्यात येत आहे.

योजनेस प्रदान केलेली तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता मध्यम प्रकल्प कार्यासनाच्या नोंदवही मध्ये अनुक्रमांक ०१/२०२६ वर नोंदवण्यात आली आहे.

➢ **<u>तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.</u>**

१) सदर प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत व सुधारित प्रशासकीय मान्यता तरतुदीच्या मर्यादेत पुर्ण करण्यात यावे.

२) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या छाननी अहवालातील उपस्थित सर्व मुद्यांची पूर्तता / अनुपालन करण्यात यावे.

३) भूसंपादनाचा निधी वितरित करताना, संबंधित अधीक्षक अभियंता यांनी प्रत्येक भूसंपादन प्रकरणाची सखोल तपासणी करून, देय असलेली रक्कम उचित असल्याची खातरजमा करूनच निधी वितरित करावा.

४) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, निधी वितरण अथवा अतिरिक्त खर्च न करणेची जवाबदारी महामंडळाची राहील.

५) प्रकल्पासाठी आवश्यक वैधानिक व तांत्रिक मान्यता सक्षम स्तरावर घेण्यात याव्यात.

६) सुधारीत प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील तांत्रिक बाबी अथवा निविदाविषयक क्षेत्रीय स्तरावरील निर्णयास किंवा झालेल्या क्षेत्रीय अनियमिततेस मान्यता गृहीत धरली जाणार नाही. अशा प्रकरणांची तपासणी त्यावेळी प्रचलित शासन निर्णयानुसार करणे आवश्यक असून याची सर्वस्वी जबाबदारी महामंडळाची राहील.

७) प्रकल्पाची अंमलबजावणी करतांना प्रचलित शासन निर्णय, नियम, CVC मार्गदर्शक तत्वे, वित्तीय अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दती याची काटेकोर अंमलबजावणी करणे, आवश्यकतेनुसार राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने प्रकल्पाच्या व कामाच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशांचे व त्रुटींची पूर्तता करणे याची सर्वस्वी जबाबदारी महामंडळाची राहील.

या प्रकल्पाच्या कामावर होणारा खर्च मुख्य लेखाशीर्ष आय-५, ४७०१ मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्प यावरील भांडवली खर्च ८०, सर्वसाधारण -१ १९०, सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणूका (०२) योजनांतर्गत, (०२) (०४) तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव भाग भांडवली अंशदान (४७०१-एच ७६३) या लेखाशिर्षाखाली टाकावा व त्याखालील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने व्यय अग्रक्रम समितीच्या दि. ०१/१०/२०२५ रोजीच्या बैठकीत देण्यात आलेल्या अभिप्रायानुसार व मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक २४/०३/२०२६ रोजी झालेल्या बैठकीमधे घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०४१७१२१६५४३८२७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KALE RAJESH SHRIRAM

Digitally signed by KALE RAJESH SHRIRAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Water Resources Department, 2.5.4.20=EFCCF1ACB0C7420E61D73F39B9C1FC48432CC58660EF9114351D4B21061A596D, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9840C1037F8E67CB885EA6AED6FF1F33CFE46584242D1A9C342CD74DD5078F59, cn=KALE RAJESH SHRIRAM
Date: 2026.04.17 12:18:32 +05'30'

**सहपत्र :- उपशीर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा**

**(राजेश काळे)**
**शासनाचे अवर सचिव**

**प्रत, सहपत्रांसह :-**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२) मा. मुख्यमंत्री महोदय यांचे प्रधानसचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. मंत्री जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण विकास महामंडळ) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई
५) अपर मुख्य सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
८) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
९) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) महालेखापाल-१/२ (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
११) कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव.
१२) मुख्य अभियंता (प्र) व सह सचिव यांचे स्वीय सहाय्यक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव.
१४) वित्त विभाग (कार्यासन व्यय-१२/अर्थ-०२/अर्थ-१०/व्यय-६ अ ), मंत्रालय, मुंबई.
१५) नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई.
१६) मध्यम प्रकल्प कार्यासन संग्रहार्थ.

**उप शिर्षनिहाय तरतुदींचा गोषवारा**
**शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्प, ता. जि.जळगांव तृतीय सुधारित प्रशासकीय मान्यता**
**शासन निर्णय क्रमांक:- सुप्रमा-२०२४/(प्र.क्र.१५/२४)/(मध्यम प्रकल्प).**
**दिनांक:- १७ एप्रिल २०२६**

| अ.क्र | बाब | मंजूर द्वितीय सुप्रमा नुसार | प्रस्तावित तृतीय सुप्रमानुसार | वाढ / घट (+/-) |
|---|---|---|---|---|
| १ | अ- प्राथमिक | ०.८६ | ०.८६ | ०.०० |
| २ | ब- भूसंपादन | १७२.३८ | ४१७.१९ | २४४.८० |
| ३ | क- मुख्य कामे | ५३९.१९ | ६५९.९९ | १२०.८० |
| ४ | ड- मुख्य विमोचक | ०.० | ०. | ०.० |
| ५ | के- ईमारती | ०.९८ | ०.९८ | ०.०० |
| ६ | एल- मातीकाम | ०.० | ०.०० | ०.०० |
| ७ | एम- लागवड | १.३५ | १.५० | ०.१५ |
| ८ | ओ- संकीर्ण | १.१२ | १.२४ | ०.१२ |
| ९ | पी- देखभाल | ७.०९ | ८.७८ | १.८९ |
| १० | क्यु- हत्यारे व अवजारे | ०.१९ | ०.४२ | ०.२३ |
| ११ | आर- दळणवळण | १४८.९९ | २१७.६४ | ६८.६५ |
| १२ | एक्स- पर्यावरण | ९.४६ | ९.४६ | ०.०० |
| १३ | **एकूण** | **८८१.४२** | **१३१८.०६** | **४३६.६४** |
| १४ | **अनुषंगीक खर्च** | **८७.५५** | **८९.१४** | **१.५९** |
| १५ | **एकूण** | **९६८.९६** | **१४०७.२०** | **४३८.२३** |

KALE RAJESH SHRIRAM

Digitally signed by KALE RAJESH SHRIRAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Water Resources Department,
2.5.4.20=EFCCF1ACB0C7420E61D73F39B9C1FC48432CC58660EF9114351D4B21061A596D, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=9840C1037F8E67CB885EA6AED6FF1F33CFE46584242D1A9C342CD74DD5078F59, cn=KALE RAJESH SHRIRAM
Date: 2026.04.17 12:18:52 +05'30'

**(राजेश काळे)**
**शासनाचे अवर सचिव**